# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ६/२०१३-१४/३१ दिनांक : २४.४.२०१४

**<u>अंतरिम आदेश केस क्र.६/१४-१५</u>**

| | | |
|---|---|---|
| | श्री. माधव गंगाराम पाटील,<br>मु.पो.शिरोली दुमाला, ता.करवीर,<br>जिल्हा - कोल्हापूर. | अर्जदार |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, ग्रामीण १, कोल्हापूर. | विरुध्द पक्षकार |

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री.बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

तक्रारदार श्री.माधव गंगाराम पाटील, यांच्या वडिलांच्या नांवे असलेले वीज कनेक्शन क्र. २६६७७०००५३९६ वितरण कंपनीने थकबाकीपोटी मार्च,१४ मध्ये बंद केले आहे. तक्रारदाराने अनुसुची अ मध्ये मंचाकडे दि.१६.०४.१४ रोजी अर्ज करुन वीजपुरवठा पुर्ववत जोडून मिळावा अशी मागणी केली आहे. अर्जासोबत केलेल्या लेखी अहवालात तक्रारदाराने दोन वेगवेगळ्या कनेक्शनची थकबाकी व त्यावरील व्याजासंबंधी वाद उत्पन्न केल्याचे दिसते.

कनेक्शन क्र. २६६७७०००६०८२ वर रु.१९,५६४.९० इतकी बाकी मार्च,१० अखेर दाखविली आहे. सदरचे कनेक्शन सप्टेंबर,०८ मध्ये कायमस्वरुपी बंद करण्यात आले आहे. तसेच ग्राहक क्र. २६६७७०००५३९६/७ वर मार्च,१०अखेर रु.३४,९८६.४७ व त्यानंतर डिसेंबर,१३ पर्यंतची बिले असे मिळून रु.७४,४९२.१५ बाकी दिसून येते. तथापि वि.प.कडून हजर केलेल्या स्टेटमेंटमध्ये एकत्रित सर्व हिशेब करुन तसेच ग्राहकाने भरलेली रक्कम वजा जाता डिसेंबर,१३ अखेर ग्राहकाकडे रु.६८,७०६.५३ इतकी बाकी देय असल्याचे वि.प.ने आपल्या पत्रात नमुद केले आहे.

तक्रारदार सुनावणीच्यावेळी ग्राहक स्वतः उपस्थित होते. वितरण कंपनीचे श्री.आरळी, नोडल ऑफीसर व श्री.जोगी, सहाय्यक अभियंता, परिते, हजर होते. सुनावणी दरम्यान चर्चेच्यावेळी ग्राहक क्र. २६६७७०००५३९६/७ ची थकबाकी मार्च,२०१० ला ग्राहकाने मान्य केल्याने वितरण कंपनीने रु.१९,५६४/- इतकी adjustment करुन दिल्याचे दिसते. तक्रारदाराने भरलेली रक्कम पूर्वीच्या थकबाकी खात्यात वर्ग केल्याने व्याजाच्या रकमा दोन्ही खात्यात वाढत गेल्या आहेत. चालू बील व थकबाकी मिळून प्रथमदर्शनी एकंदर अंदाजे रु.४०,०००/- ग्राहकाकडे थकित आहे असे दिसते. ग्राहकाचे म्हणण्यानुसार ग्राहक थकबाकीची पोकळ रक्कम देण्यास जबाबदार नाही. कारण बील दुरुस्तीसाठी गेली चार वर्षे पाठपुरावा करीत आहे. लेखी पत्रव्यवहार केला आहे. ग्राहक क्र. २६६७७०००५३९६/७ या कनेक्शनपोटी मार्च,१० पर्यंत देय असलेली रक्कम अंदाजे रु.५,०००/- व पूर्वीच्या थकबाकी रकमेपोटी रु.५,०००/- असे एकूण रु.१०,०००/- ग्राहकाने वितरण कंपनीकडे त्वरित एकरकमी भरल्यानंतर वरील कनेक्शनमार्फत वीजपुरवठा करावा असा आदेश देणे योग्य होइ्रल असे मंचाचे मत आहे. पुर्नजोडणी आकार स्वतंत्ररित्या भरला पाहिजे.

## आदेश

१) ग्राहकाने वितरण कंपनीकडे रु.१०,०००/- भरल्यानंतर त्याला त्वरित वीजपुरवठा द्यावा असे आदेश देण्यात येतात. पुर्नजोडणी आकार स्वतंत्ररित्या कंपनीकडे भरावा.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : २४.४.२०१४

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष

श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य .. सही/-

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष